www. sahyandrinews.com

दैनिक

# सह्याद्रीचा राखणदार

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

• (महाराष्ट्र) वर्ष ०१ ले • अंक २९३ • RNI : MAHMAR/2023/87818 • गुरुवार दि.१ ऑगस्ट२०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

Scan QR code to visit ... Epaper Portal

## विदर्भवादी १० ऑगस्टला नागपूर विधान भवनावर फडकवणार स्वतंत्र विदर्भाचा झेंडा

### अबकी बार विदर्भ की सरकार;विदर्भ राज्य आंदोलन समितीचा निर्णय



**नागपूर । प्रतिनिधी**

गेल्या ११९ वर्षापासून स्वतंत्र विदर्भ राज्य निर्माण व्हावे, यासाठी विविध व्यासपीठावर मागणी करून आणि १२ वर्षापासून सतत अनेक जनआंदोलने करून विदर्भ राज्य आंदोलन समितीने विदर्भ राज्याची मागणी तीव्र केली आहे. आता विदर्भ राज्य आंदोलन समिती १० ऑगस्ट रोजी नागपूर येथील विधानभवनावर स्वतंत्र विदर्भ राज्याचा ध्वज फडकवणार आहे, असा निर्णय नागपूर जिल्हा व महानगर कार्यकारिणी बैठकीत घेण्यात आला.

स्वतंत्र विदर्भ राज्य निर्मितीसाठी आणि विदर्भातील नागरिकांवरील अन्याय संपविण्याच्या दृष्टीने नव्या केंद्र सरकारला इशारा देण्यासाठी महाराष्ट्रवादी चले जाओ'चा नारा देत समिती पुन्हा रणशिंग फुंकणार आहे. कुठल्याही परिस्थितीत १० ऑगस्ट २०२४ ला विदर्भ राज्य आंदोलन समितीने नागपूर येथे विधानभवनावर स्वतंत्र विदर्भ राज्याचा झंडा फडकवणारच, असा निर्धार व्यक्त केला आहे. या आंदोलनापूर्वी समितीचे कार्यकर्ते यशवंत स्टेडियम येथे १० ऑगस्ट रोजी दुपारी १२ वाजता एकत्र येणार असून त्यानंतर समितीचे सर्व पदाधिकारी व






कार्यकर्ते विधानभवनापर्यंत लाँगमार्चद्वारे जाऊन विधानभवनावर स्वतंत्र विदर्भ राज्याचा ध्वज फडकविणार आहेत.

या आंदोलना दरम्यान केंद्र सरकारने शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमुक्ती करावी, अन्नधान्यावरील जीएसटी तत्काळ रद्द करण्यात यावी, अतिवृष्टीने झालेल्या पिक नुकसानीची भरपाई तत्काळ देण्यात यावी, साप चावून मरणाऱ्या व्यक्तीस इतर वन्यजीवा प्रमाणेच मदत मिळावी, राज्यात दुष्काळी परिस्थिती असल्यामुळे पिक विमाधारक शेतकऱ्यांना पिकविम्याची मदत देण्यात यावी, विदर्भात स्मार्ट प्रीपेड मीटर कुठेही लावू नये या मागण्या करण्यात येणार आहे.

२०१४ मध्ये सत्तेत येण्यापूर्वी स्वतंत्र विदर्भ राज्याचे लिखित आश्वासन देऊनही आजपर्यंत विदर्भाचे राज्य निर्माण केले नाही, म्हणून बीजेपीला विदर्भातून हद्दपार व्हावे लागले. तसेच विदर्भात शिवसेना शिंदे गटाचे खाते सुद्धा उघडू शकले नाही. नव्या सरकारने विदर्भाचे राज्य त्वरित निर्माण केले नाही तर विदर्भाची जनता भाजपला विदर्भात चारीमुंड्या चीत केल्याशिवाय राहणार नाही. अबकी बार विदर्भ की सरकार'चा नारा जनतेपुढे नेऊन विदर्भाचे आंदोलन अधिक तीव्र करण्याचा निर्णय बैठकीत करण्यात आला.

## थोडक्यात

### गृहमंत्री, राज्याच्या डीजींनी राजीनामा द्यावा

**मुंबई**–महाराष्ट्राच्या राजकारणात कधीही एवढ्या मोठ्या प्रमाणात कायदा सुव्यवस्था बिघडली नाही. कनिष्ठ पातळीवरील पोलीस अधिकाऱ्यांवर वरिष्ठ पातळीवरील अधिकाऱ्यांचा दबाव आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात कायदा सुव्यवस्था देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यकाळातच बिघडली आहे. वरिष्ठ अधिकारी रश्मी शुक्ला यांचा पोस्टिंग देखील एका चुकीच्या प्रकारच्या व्यवस्थेच्या माध्यमातून करण्यात आली आहे. त्यामुळे आमदार जितेंद्र आव्हाड यांच्यावर झालेल्या हल्ल्याची जबाबदारी घेऊन गृहमंत्री देवेंद्र फडणवीस आणि डीजी रश्मी शुक्ला यांनी राजीनामा द्यावा, अशी आमची मागणी असल्याचे काँग्रेसचे प्रदेश अध्यक्ष नाना पटोले यांनी म्हटले आहे.जितेंद्र आव्हाड यांच्या गाडीवर झालेल्या हल्ल्यामुळे राज्यभरातून प्रतिक्रिया उमटल्या आहेत. राज्याच्या डीजी या पूर्णतः भारतीय जनता पक्षासाठी काम करत आहेत. एक प्रमुख पदावर बसलेल्या अधिकारी या पद्धतीने वागत असेल तर राज्यात कायदा सुव्यवस्थेचे प्रश्न निर्माण होईलच. त्यामुळे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस आणि राज्याच्या डीजी यांनी या हल्ल्याची जबाबदारी घेऊन राजीनामे द्यावेत, अशी मागणी काँग्रेस पक्षाच्या वतीने करत असल्याचे नाना पटोले यांनी म्हटले आहे.

### फडणवीस हे महाराष्ट्रातच राहावेत

**मुंबई**–उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष होणार असल्याच्या चर्चा राजकीय वर्तुळात सुरु आहेत. या चर्चांवर आता राजकीय नेत्यांकडून प्रतिक्रिया येत आहेत. भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी प्रतिक्रिया देत सूचक विधान केले.फडणवीस हे भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष होणार या चर्चासंदर्भात माध्यमांनी बावनकुळे यांना प्रश्न विचारला. तेव्हा बावनकुळे म्हणाले की, देवेंद्र फडणवीस हे उत्कृष्ट संघटक आहेत. शासन आणि प्रशासनामध्ये काम करण्याचा त्यांचा मोठा अनुभव आहे. त्यामुळे संघटनेला मोठा फायदा होईल. मात्र, याबाबत केंद्रीय नेतृत्व योग्य तो निर्णय घेतील. पण माझ्या दृष्टीने केंद्रीय नेतृत्वाने निर्णय घेतल्यास आम्हाला मान्य राहील, असे सूचक विधान बावनकुळे यांनी केले. बावनकुळे पुढे बोलताना म्हणाले की, महाराष्ट्रातील १४ कोटी जनतेसाठी त्यांचे येथील सरकारमधील स्थान महत्त्वाचे आहेच. तसंच संघटनेमधीलही स्थानही महत्वाचे आहे. त्यामुळे आम्हाला हेच वाटेल की देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्रात राहावं. कारण ते आमचे नेते आहेत.

### राज्यात ४ दिवस मुसळधार पावसाचा इशारा

**मुंबई**–राज्यात पुढील चार दिवस मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. यामध्ये प्रामुख्याने विदर्भ, कोकणात पावसाचा जोर वाढणार आहे. यामुळे कोकणातील जिल्ह्यात ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. तर विदर्भासह मुंबई, ठाणे पालघरमध्ये यलो अलर्ट देण्यात आला आहे. पुढील चार दिवस म्हणजेच १ ते ४ ऑगस्ट या काळात राज्यात चांगल्या पावसाचा अंदाज आहे. गेल्या काही दिवसांपासून राज्यात मुसळधार पाऊस कोसळत होता.

### श्रीहरी बोरकर यांचे निधन

**नागभीड । प्रतिनिधी**

नागभीड तालुक्यातील वाढोणा येथील



प्रतिष्टीत नागरिक तथा शेतकरी श्रीहरी बालाजी बोरकर (वय ७४)यांचे बुधवार दि.३१जुलै रोजी दुपारी १ वाजता हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने अचानक निधन झाले.त्यांच्या पार्थिवावर गुरुवारी सकाळच्या सुमारास वाढोणा येथील स्मशान भूमीत अंत्य संस्कार करण्यात आले.त्यांच्या पश्चात पत्नी,दोन मुलें,दोन मुलीं,सुनां, जावई,नातवंडे व बराच मोठा आप्तपरिवारआहे.

## दरवाजा उघडताच महिला २० फूट खड्ड्यात कोसळली

### चंद्रपुरातील धक्कादायक घटना


**चंद्रपूर । प्रतिनिधी**

शहरातील रयतवारी कॉलनी भागात धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या भागापासून काही अंतरावर कोळसा खाणी आहेत, त्या खाणींचा दुष्परिणाम येथील नागरिकांना कायमच सहन करावा लागतो. त्यातच एका घरात चक्क २० फूट खड्डा पडल्याने वसाहतीत एकच गोंधळ उडाला. तर या खड्ड्यात महिला पडल्याने तिला जबर मार बसला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, रयतवारी कॉलनीत राहणारे शिवणकर कुटुंबिय हे दोन दिवसांपासून बाहेरगावी गेलेले होते. ते आज सकाळी घरी पोहोचल्यानंतर महिलेने कुलूप उघडून दरवाजा उघडला अन् घरात पाय ठेवताच ती महिला थेट वीस फूट खोल खड्ड्यातच जाऊन पडली. त्यामुळे कुटुंबासह परिसरातील लोक घाबरले. नेमकं काय झालं हे कोणालाच कळत नव्हते, अखेर नागरिकांनी धाव घेत शिडी टाकून त्या महिलेला वर काढले व रुग्णालयात दाखल केले. सदर महिलेला जबर मार लागल्याचे कुटुंबियांनी सांगितले आहे.

### आमदार किशोर जोरगेवार यांनी केली पाहणी

या घटनेची माहिती मिळताच आमदार किशोर जोरगेवार यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी करत प्रशासनाला आवश्यक सूचना केल्या आहे.यावेळी तहसीलदार विजय पवार, सहायक आयुक्त सचिन माकोडे, रामनगर ठाणेदार सुनिल गाडे,अजय जैस्वाल, यंग चांदा ब्रिगेडचे चंद्रराज बाथो, राजेश अडुर आणि वेकोलिच्या अधिकाऱ्यांची उपस्थिती होती.



घरातील सुनिता नामक महिला दरवाजा उघडताच अचानक खड्ड्यात पडली. स्थानिकांनी तात्काळ मदत करत शिडीच्या सहाय्याने तिला बाहेर काढले. सुदैवाने मोठी दुर्घटना टळली. परंतु, शिवणकर कुटुंबावर ही घटना अत्यंत भीषण असल्याने त्यांना तातडीने मदत पुरवण्यात आली. गेले दहा दिवस चंद्रपूर शहर –जिल्ह्यात होणारी अतिवृष्टी व कोळसा खाणीमुळे पोकळ झालेला भूभाग यामुळे हा प्रकार घडला असल्याची प्राथमिक माहिती आहे.

घडलेल्या या घटनेमुळे नागरिकांमध्ये भितीचे वातावरण पसरले आहे. या भागातील सुरक्षितता तपासण्यासाठी आणि अशा घटनांना आळा घालण्यासाठी वेकोली प्रशासनाने तातडीने सर्वेक्षण करून आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशा सुचना आमदार जोरगेवार यांनी दिल्या.शिवणकर कुटुंबाच्या राहण्याची सोय वेकोलि वसाहतीत करण्याचे आदेशही त्यांनी दिले आहेत. मनपा प्रशासनाने तातडीने पिडीत कुटुंबाला मदत करावी आणि या सर्व प्रकरणाची चौकशी करण्यात यावी, अशीही सूचना आमदारांनी केलीआहे.

### वैधकीय शिक्षण क्षेत्रात खळबळ

## धक्कादायक ! तिसऱ्या माळ्यावरून उडी घेत विद्यार्थीनीने संपवली जीवनयात्रा

### सावंगीच्या वैद्यकीय महाविद्यालयातील घटना



**वर्धा । प्रतिनिधी**

वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या एका विद्यार्थीनीने सावंगी (मेघे) येथील महाविद्यालयातील प्राचार्यांच्या जाचाला कंटाळून तीसऱ्या माळ्यावरून उडी घेत आत्महत्या केली ही धक्कादायक घटना आज (१ आगस्ट) रोजी दुपारच्या सुमारास घडली. पूजा रजनी (वय २२) असे मृतक विद्यार्थिनीचे नाव आहे .मृतक विद्यार्थीनी एमबीबीएसच्या दुसऱ्या वर्षाला शिक्षण घेत असून महाविद्यालय प्रशासन परिक्षेला बसू देणार की नाही या भीतीपोटी तीने आत्महत्या केल्याचे बोलल्या जात आहे.

सावंगी मेघे येथील जवाहरलाल नेहरू मेडिकल कॉलेजमध्ये नागपूर येथील पूजा रजनी (वय २२) ही विद्यार्थीनी एमबीबीएसच्या दुसऱ्या वर्षाला शिक्षण घेत होती. नियमानुसार परिक्षेला बसण्यासाठी ७५ टक्के उपस्थिती अनिवार्य आहे. परंतु कॉलेजच्या नियमानुसार तीची हजेरी कमी होती. त्यामुळे प्राचार्यांनी तीला परिक्षेला बसू देणार नाही, अशी तंबी दिली. तीने परिक्षेला बसू देण्यासाठी प्राचार्यांना विनंती देखील केली. परंतु त्यांनी तीचं काही एक ऐकून घेतले नाही. शेवटी हताश झालेल्या त्या विद्यार्थीनीने प्राचार्यांच्या कार्यालया समोरील तीसऱ्या माळ्याच्या गॅलर खाली उडी घेत आत्महत्या केली. यात तीचा मृत्यू झाला.

### खा.अमर काळे यांनी पुलगाव स्थानकावरील

## रेल्वे थांब्याचा मुद्दा लोकसभेत मांडला

### वरुड मोर्शी येथील संत्रा उत्पादकची व्यथा मांडली संसद भवनात

**पुलगाव । प्रतिनिधी**

मागील कोरोना काळा पासून पुलगाव, हिंगणघाट, धामणगाव, चांदुर येथील बंद करण्यात आलेल्या रेल्वे गाडी चे थांबे पूर्ववत करण्यासाठी लोकसभेत रेल्वेमंत्री समक्ष लोकसभा अध्यक्षांच्या परवानगीने वर्धेचे खासदार अमर काळे यांनी मुद्दा मांडून संबोधित करत म्हटले की हावडा अहमदाबाद, बिलासपूर पुणे, या दोन्ही ट्रेन चे थांबे पुलगाव रेल्वे स्थानकावर नियमित होते. त्यामुळे येथील व परिसरातील प्रवासी, देशाची रक्षा करणारे सैनिक, विद्यार्थी व मजदूर वर्ग दैनंदिन प्रवास करून आपली आजीविका चालवत होते. परंतु कोरोना काळात दक्षता घेत या गाड्यांचे थांबे बंद करण्यात आले होते, आज कोरोना नंतर ५ वर्ष लोटून सुद्धा या गाडी चे पुलगाव येथे बंद केलेले थांबे सुरु करण्यात आले नाही. एक लोक प्रतिनिधी या नात्याने रेल्वे मंत्री महोदय ला विनंती व मागणी आहे की हे पूर्ववत करावे तसेच वरुड मोर्शी येथील संत्रा उत्पादकची व्यथा मांडून या कडे लक्ष देण्याची विनंती लोकसभा अध्यक्ष यांना केली .




या आधी १० वर्ष पासून भारतीय जनता पार्टीचे खासदार रामदास तडस यांना पुलगावच्या जनतेनी बंद हावडा अहमदाबाद, बिलासपूर पुणे गाडी चा बंद झालेला थांबे पूर्ववत सुरु करण्यासाठी विनंती वजा पाठ पुरावा सतत केला.मात्र माजी खासदार यांनी आश्वासन दिले. पण या दोन्ही गाडीच्या पुलगाव कराची मागणी कडे रेल्वे विभागाने लक्ष दिले नाही.मात्र आता खासदार अमर काळे यांनी लोकसभेत मुद्दा मांडून एका सजग जनप्रतिनिधी चे कर्तव्य बजावल्या बदल पुलगावकरानी त्यांचे आभार व्यक्त केला आहे.त्यांच्या प्रयत्नांना किती यश येते, याकडे पुलगावकरांचेलक्षलागलेआहे.

## चंद्रपूर पोलीस ॲक्शन मोडवर...!

### देशी कट्ट्यासह ७ जिवंत काडतूस जप्त,आरोपीअटकेत

### अवैधरित्या हत्यार बाळगणाऱ्याच्या आवळल्या मुसक्या





**चंद्रपूर । आशिष घुमे**

जिल्ह्यात वाढत्या गुन्हेगारीचा कल बघता पोलीस यंत्रणा क्शन मोडवर आली आहे. जिल्ह्यात सुरू असलेले अवैध व्यवसाय व त्यातून घडणारे गुन्हे रोखण्याकरीता अवैधरित्या हत्यार बाळगणाऱ्याची माहिती काढून त्यांच्या मुसक्या आवळल्या जात आहे. अशातच बल्लारपूर येथील एका इसमाकडून देशी कट्ट्यासह ७ जिवंत काडतूस जप्त करून गुन्हादाखलकरण्यात आला . रोहीत शिवप्रसाद निषाद, वय २४ वर्ष, आरोपीचे नाव असून तो भगतसिंग वार्ड, बल्लारपूर ता. जि. चंद्रपुर येथिल रहिवाशी आहे .

चंद्रपुर जिल्ह्यामध्ये होत असलेल्या अवैध धंदे, अवैध हत्यार बाळगणाऱ्या इसमांची माहिती काढून त्यावर कार्यवाही करण्याचे आदेश चंद्रपूरचे पोलीस अधिक्षक, मुमक्का सुदर्शन अपर पोलीस अधिक्षक रिना जनबंधु यांनी दिले होते. त्याअनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक महेश कॉंडावार यांचे नेतृत्वात स्थानिक गुन्हे शाखेचे पथक अवैध रित्या हत्यार बाळगणाऱ्यांवर माहिती काढून त्यावर कार्यवाही करण्याची मोहीम राबवित होते. सदर मोहिमेदरम्यान पथकाला गोपनिय माहिती मिळाली की, मौजा बल्लारपूर येथील भगतसिंग वार्डामधील डब्लुसिएल ग्राउंडवर एक इसम आपले कमरेला गावठी देशी कट्टा लावून उभा आहे. सदर माहितीवरून पोउपनि. भुरले त्यांच्या टिमसह तात्काळ रवाना होवून सदर इसमास ताब्यात घेवून त्याची तपासणी केली असता, सदर इसमाच्या कमरेला लागून असलेला एक देशी कट्टा तसेच त्याच्या पैटच्या खिशात देशी कट्यात वापरण्यात येणारे ०७ भग जीवंत काडतूस व एक नग खाली केस मिळून आले. सदर इसमाविरूद्ध पोस्टे बल्लारपूर येथे अवैधरित्या शस्त्र बाळगणेबाबत गुन्हा नोंद केला असून सदर इसमास पुढिल तपासकामी पोस्टे बल्लारपूर यांच्या ताब्यात देण्यात आले.

सदरची कामगिरी पोलीस अधिक्षक, चंद्रपुर, अपर पोलीस अधिक्षक, चंद्रपुर यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक महेश कोंडावार यांचे नेतृत्वात पोउपनि. विनोद भुरले, पोहवा. दिपक डॉगरे, पोहवर, सतिश अवथरे, नापोकॉं. संतोष येलपुलवार, पोकॉ. गोपाल आतफुलवार, पोकॉ. नितीन रायपुरे, पोकॉं. गोपीनाथ नरोटे, अमोल सावे, गणेश भोयरयांनीकेलीआहे.

# महसूल विभागाचे नाव उंचविण्यासाठी जबाबदारीने काम करा–जिल्हाधिकारी गौडा

## रक्तदानाने महसूल पंधरवड्याचा शुभारंभ

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

महसूल विभाग हा शासनाचा अतिशय महत्वाचा विभाग असून सर्वसामान्य नागरिकांचा सर्वाधिक संपर्क या विभागासोबत येतो. त्यामुळे नागरिकांना आपल्या विभागाकडून जास्त अपेक्षा आहे. लोकांच्या या अपेक्षेवर खरे उतरून महसूल विभागाचे नाव उंचविण्यासाठी जबाबदारीने काम करा, असे आवाहन जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना केले.

नियोजन भवन येथे महसूल दिनानिमित्त (१ ऑगस्ट) आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी मंचावर अतिरिक्त जिल्हाधिकारी श्रीकांत देशपांडे, निवासी उपजिल्हाधिकारी संजय पवार, उपजिल्हाधिकारी दगडू कुंभार, चंद्रपूरचे उपविभागीय अधिकारी संजय पवार आदी उपस्थित होते. यावेळी कर्मचा-यांच्या वतीने रक्तदान करून महसूल पंधरवड्याचा शुभारंभ करण्यात आला.

आजपासून महसूल पंधरवडा सुरू झाला, असे सांगून जिल्हाधिकारी विनय गौडा म्हणाले, महसूल विभागाला जिल्ह्यातील विविध विभागांशी समन्वय ठेवून शासनाचे काम ठराविक कालावधीत करावे लागते. नियमित कामाच्या व्यतिरिक्त आपत्ती व्यवस्थापन असो की निवडणूक विषयक कामे, या सर्व कामांमध्ये सर्वाधिक जबाबदारी ही महसूल विभागाची असते. शिवाय नागरिकांचाही सर्वाधिक संपर्क आपल्या विभागाशी येत असतो. त्यामुळे लोकांसाठी आपण काम करतो, याची जाणीव ठेवून जबाबदारीने काम केल्यास आपल्याला सरकारमध्ये तसेच समाजातही सन्मान मिळतो. महसूल संघटनेच्या मागण्या रास्त असून त्या सर्व शासन स्तरावरील आहेत. संघटनांनी आपल्या मागण्या योग्य मार्गाने शासन दरबारी मांडाव्यात, अशाही सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या.





यावेळी अतिरिक्त जिल्हाधिकारी श्रीकांत देशपांडे म्हणाले, आजपासून रक्तदान शिबिराने महसूल पंधरवड्याचा शुभारंभ झाला आहे. या पंधरवड्यात चांगल्या पध्दतीने कामकाज करू, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तर उपविभागीय अधिकारी संजय पवार म्हणाले, महसूल विभागात काम करण्याचे भाग्य आपल्याला मिळाले आहे. सर्व विभागांना स्पर्श करणारा हा विभाग आहे. सामाजिक बांधिलकी आणि सकारात्मक भावनेने काम केले तर आपण नक्कीच यशस्वी होऊ, असे मत त्यांनी व्यक्त केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक महसूल कर्मचारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष शैलेश धात्रक यांनी तर संचालन उपाध्यक्ष अजय मेकलवार यांनी केले. कार्यक्रमाला जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी ,कर्मचारी उपस्थित होते.

### रक्तदान शिबीर

**महसूल दिनानिमित्त नियोजन भवन येथे रक्तदान करण्यात आले. यावेळी राहुल फणसे, सचिन राठोड आणि सुनील चांदेवार यांनी रक्तदान केले. यासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयातील रक्तपेढीचे डॉ. मिलिंद झाडे, डॉ. क्षितीजा यांच्यासह लक्ष्मीकांत गाखरे, पंकज पवार, अमोल रामटेके, आशिष कांबळे उपस्थित होते.**

# विवेकानंद विद्यालयात लोकमान्य टिळक पुण्यतिथी

**पुलगाव । प्रतिनिधी**

स्थानिय विवेकानंद विद्यालयात लोकमान्य टिळक पुण्यतिथी साजरी करण्यात आली. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षा म्हणून मुख्याध्यापिका रोशनी काळे व प्रमुख वक्ते म्हणून संस्थेचे प्रशासन अधिकारी वसंत उपाध्ये मंचावर उपस्थित होते.

पाहुण्यांच्या हस्ते शारदा मातेच्या प्रतिमेस तसेच लोकमान्य टिळकांच्या प्रतिमेस माल्या अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.वर्ग चौथीचे विद्यार्थी एकता शिवरकर, श्रुतिका फटिंग परी शिवरकर, तनुष्का अलोने यांनी लोकमान्य टिळक यांच्या जीवनावर आधारित माहिती सांगितली.यावेळी

लोकमान्य टिळकांच्या सारखा निर्भीडपणा विद्यार्थ्यांनमध्ये असावा,असे प्रतिपादन मुख्याध्यपिका काळे यांनी केले.तसेच वसंत उपाध्ये यांनी लोकमान्य टिळकांनी वर्तमानपत्र सुरू करून तसेच गणेशोत्सव व शिवजयंती सार्वजनिक करून भारतीयांना एकत्र आणून इंग्रजांशी लढा देण्याचे कार्य केलं अशा प्रकारे लोकमान्य टिळकांच्या कार्याचा गौरव केला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षिका धनश्री बांद्रे यांनी केले. कार्यक्रमाला सचिन मेश्राम,शालू पांडे, अनिता सोनवाल यांच्यासह शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.




# सेंट जॉन हायस्कूलमध्ये करिअर मार्गदर्शन शिबिर

**पुलगाव । प्रतिनिधी**

स्थानिक यशबोध प्रबोधिनी संस्थेद्वारे संचालित सेंट जॉन हायस्कूल आणि कनिष्ठ विज्ञान महाविद्यालयात ३१ जुलै २०२४ रोजी करिअर मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. ज्यामध्ये प्रमुख पाहुणे म्हणून उज्वल जळगावकर उपस्थित होते. ते अमेरिकेच्या डर्विन कॅलिफोर्निया मध्ये राहतात .

कार्यक्रमात शाळेचे मुख्याध्यापक संतोष यादव , उपप्राचार्या आरती कुरझडकर उपस्थित होत्या. इयत्ता ११ वी व १२ वीच्या विद्यार्थ्यांसाठी करिअर मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. आपल्या व्याख्यानात जळगावकर यांनी वैद्यकीय क्षेत्रातील त्यांचे अनुभव आणि या उद्योगात करिअर करण्यासाठी तुम्हाला काय करावे लागेल हे सांगितले. या वैद्यकीय क्षेत्रात करिअरच्या कोणत्या संधी आहेत याची माहिती दिली. कार्यक्रमात सर्व विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. कार्यक्रमाचे संचालन संजय गुप्ता यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.



# सेंट जॉन हायस्कूलमध्ये कारगिल विजय दिवस साजरा




**पुलगाव । प्रतिनिधी**

स्थानिक यशबोध ज्ञानप्रबोधिनी संस्थेद्वारे संचालित सेंट जॉन हायस्कूल मध्ये २६ जुलै २०२४ रोजी 'कारगिल विजय दिवस' साजरा करण्यात आला. याप्रसंगी ज्ञानेश्वरी कोंबे आणि माही ढोले यांनी आपल्या भाषणात आपल्या सैनिकांच्या शौर्याबद्दल सांगितले. दिशा वर्मा आणि कृष्णप्रिया घोटेकर यांनी आपल्या गाण्यातून सैनिकांचे शौर्य दाखवून त्यांना आदरांजली वाहिली.

शाळेमध्ये विद्यार्थ्यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यानंतर इयत्ता ११ वीचे विद्यार्थी आणि सेंट जॉन ज्युनिअर कॉलेजच्या शिक्षिका कु. दीपा जुनेजा आणि सत्यम कोथळकर सर सी.ए.डी कॅम्प द्वारे आयोजित वृक्षारोपण कार्यक्रमात सहभागी झाले होते. विद्यार्थ्यांना वृक्षारोपणाचे महत्त्व समजावून सांगितले. सी.ए.डी कॅम्प मध्ये विद्यार्थ्यांनी १४ हजार रोपे आणि ५०,हजार बियांची लागवड केली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व शिक्षक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

# लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतनिमित्त अभिवादन



**चिमूर । प्रतिनिधी**

तालुक्यातील जेतवन बुद्ध विहार, मालेवाडा येथे दि. १ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी ठीक १० वाजता लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त अभिवादनाचा कार्यक्रम संपन्न झाला.लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेला बौध्द पंच कमेटी, मालेवाडा चे अध्यक्ष जगदीश रामटेके, पत्रकार रामदास ठुसे, स्वप्नील मसराम यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून दीपप्रज्वलन करून अभिवादन केले.

याप्रसंगी योगेश मेश्राम यांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जीवनावर प्रकाश टाकला.अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य हे परिवर्तनाला दिशा व चालना देणारे ठरले आहे. महाराष्ट्राच्या एकूणच जडणघडणीत आणि परिवर्तनात या साहित्याचे योगदान हे महत्त्वपूर्ण मानले जाते. आजही मोठ्या संख्येने विद्यार्थी व अभ्यासक हे त्यांच्या या साहित्याचा संशोधनात्मक अभ्यास करताना दिसतात. संयुक्त महाराष्ट्र चळवळ लोकमानसात रुजविण्याचे काम शाहीर अण्णा भाऊ साठे यांनी केले. अशा शब्दात मान्यवरांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या कार्याचं स्मरण करून त्यांना अभिवादन केलं.यावेळी सत्यफुलाबाई चव्हाण, शकुंतलाबाई मेश्राम, गंगाधर गजभिये,विराज गजभिये आदी मान्यवर ग्रामस्थ उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन योगेश मेश्राम यांनी केले व आभार प्रदीप मेश्रामयांनीमानले.

## छ.शिवाजी महाराज प्रशासकीय सेवा महाविद्यालय सूर्ला वरोरा येथे साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे जयंती साजरी



**वरोरा । प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय सेवा महाविद्यालय सूर्ला वरोरा येथे साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे जयंती साजरी करण्यात आली या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष सुधाकर खरवडे (अध्यक्ष सनय बहुउद्देशीय संस्था चंद्रपूर ) यांनी मोलाचे मार्गदर्शन केले . तसेच प्रमुख मार्गदर्शक कुलदीप कोटांबे (संचालक एक्ससिल्लेन्स आयएएस अकॅडेमी पुणे ) यांनी विद्यार्थ्यांना स्पर्धापरीक्षा विषयी मार्गदर्शन केले तसेच राहुल बाजयितयांनी मार्गदर्शन केले. महाविद्यालयाचे प्राचार्य दिनकर गुरनुले प्रा.विनोद कोरडे प्रा. दिपक खामनकर , प्रा. मनोज खंडाळकर, प्रा. सुहास झाडे प्रा. भारती पाटील ,प्रा. निकिता कापसे उपस्थित होते . या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महाविद्यालयाची विद्यार्थिनी सानिया सलामे तर आभार प्रदर्शन सपना मेश्राम यांनी केले. तसेच तुषार कडू यांनी कार्यक्रम यशस्वीतेसाठीसहकार्यकेले.

# उपजिल्हा रुग्णालय वरोरा येथे शाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी



**वरोरा । प्रतिनिधी**

उपजिल्हा रुग्णालयात शाहीर अण्णाभाऊ साठे याची जयंती साजरी करण्यात आली.

अण्णाभाऊ साठे यांचा जीवनपट पडताळून त्यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकण्यात आला त्या नंतर प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितीत फोटोला माल्यार्पण करण्यात आले.

हा कार्यक्रम डॉ.प्रफुल खुजे वैद्यकीय अधीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला या कार्यक्रमाचे सूत्र वंदना बर्डे अधिसेविका यांनी सांभाळले या कार्यक्रमासाठी डॉ.अस्विनी गेडाम स्त्रीरोगतज्ज्ञ , गीतांजली ढोक आहारतज्ञ, ओंकार मडावी वरिष्ठ लिपिक, बकमारे, नीता वाघमारे लक्ष्मीकांत ताले, सुमित यांची उपस्तिथी होते .

# सफाई कामगारांना न्याय देण्यासाठी प्रशासनाने दिरंगाई करू नये – ना.शंभुराज देसाई

## अखिल भारतीय सफाई मजदूर कॉंग्रेस पदाधिकारी व कार्यकर्त्यांची मंत्रालय बैठक

**मुंबई । प्रतिनिधी**

सफाई कामगारांना न्याय देण्यासाठी प्रशासनाने सफाई कामगारांच्या प्रकरणं व इतर सोई सुविधांमध्ये मध्ये दिरंगाई करु नये असे मंत्रालय, मुंबई येथे आयोजीत बैठकी मध्ये .ना. शंभुराज देसाई, उत्पादन शुल्क मंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी अधिकाऱ्यांना सूचना दिले.

मंगळवार ३० जुलै रोजी मंत्रालय, मुंबई येथे ना.शंभुराज देसाई, मंत्री यांच्या दालनात अखिल भारतीय सफाई मजदूर कॉंग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष दलित मित्र गोविंदभाई परमार तसेच संघटनेचे पदाधिकारी यांचेसह बैठक झाली.

मंत्रिमहोदय यांचेसोबत सफाई कर्मचाऱ्यांच्या मुद्द्यांवर चर्चा करण्यात आली. यात डॉ बाासाहेब आंबेडकर श्रम साफल्य आवास योजने नुसार मालकीचे जमिनी सह हक्काचें घरे बांधून देण्यात यावे, लाड पागे जीआर मध्ये अगोदरचे जीआर समाविष्ट करुन अनुसुचित जाती व घाणीशी संबंधीत इतर सर्व जाती असा उल्लेख करुन सुधारित जीआर काढण्यात यावा , असंघटीत सफाई कामगारांसाठी महर्षी वाल्मिकी सुदर्शन समाज असंघटीत सफाई कामगार बोर्ड (समिती) बनविण्यात यावे, केंद्र सरकारच्या वित्त निगमच्या धरतीवर महर्षी वाल्मिकी सुदर्शन समाज आर्थिक विकास महामंडळ बनविणे, सफाई कामगारांना जाती प्रमाणपत्र वास्तव्याची अट रद्द करून सुधारीत जाती प्रमाणपत्र देण्याचा आदेश काढणे, मा. सुप्रिम कोर्टाच्या १९९५ च्या निर्णयानुसार सफाई कामातील ठेकेदारी प्रथा बंद करावी, २००५ पासून जुन्या पेन्शन प्रमाणे लागु करण्यात यावी, महानगरपालिका, नगरपालिका, आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, पंचायत समिती मध्ये सफाई कामगार भरती करावे, मशिनरी आल्या तरी सफाई कामगारांना मेन शोअर मध्ये प्रत्यक्ष करावी लागणारी घाणीशी स्वच्छता करत आहे अश्याच्या वारस हक्क म्हणून नौकरी देऊन न्याय देणे, रोजंदारी सफाई कामगार १५ ते २० वर्षे काम केलेल्यांना शासनाचे १९९३ व लाड पागे समिती नियम २४० दिवस या आधारे त्यांना कायम स्वरूपी करण्यात यावे, या सर्व विषयावर ना.शंभुराज देसाई यांनी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना सर्व मुद्यावर अंमलबजावणी करण्याचे आदेश दिले व महत्वाच्या प्रश्नावर मॉनेटरींग कमिटी व दक्षता कमिटी, अडव्हॉक कमिटी तसेच तक्रार निवारण समिती महाराष्ट्र राज्य सचिव स्तरावर तसेच जिल्हा व तालुका विभागात बनविण्यात यावे असे आदेश दिले तसेच अखिल भारतीय सफाई मजदूर कॉंग्रेस चे राष्ट्रीय अध्यक्ष गोविंदभाई परमार यांना सर्व मागण्या पुर्ण करण्याचे आश्वासन दिले .मंत्रालयात झालेल्या बैठकी मध्ये महाराष्ट्राचे अध्यक्ष प्रताप निंदाने, जीतू रोज, विक्की बडेल, राजेश रेवते, राजेश टाकेकर, काशिनाथ जाधव, रघुनाथ जाधव, आणि महाराष्ट्रतील विविध ठिकाणचे पदाधिकारी व कार्यकर्तेउपस्थितहोते.



# ना.सुधीर मुनगंटीवार यांच्या वाढदिवसानिमित्त भाजपा युवा मोर्चा तर्फे रुग्णांना फळ वाटप

**वरोरा । प्रतिनिधी**

ना. सुधीर मुनगंटीवार मंत्री, वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री चंद्रपूर जिल्हा यांचा वाढदिवसा युवा मोर्चा महाराष्ट्र प्रदेश सचिव करण देवतळे, भारतीय जनता कामगार सेना जिल्हा उपाध्यक्ष अनिकेत नाकाडे, भारतीय जनता युवा मोर्चा शहर अध्यक्ष संजय राम यांच्या नेतृत्वात ३० जुलै रोजी सकाळी १०:०० वाजता उपजिल्हा रुग्णालय वरोरा येथे फळ वाटप तथा लहान बालकांची किट ( बेबी किट ) वाटपाचा कार्यक्रम आयोजित केला होता.

या कार्यक्रमाला भारतीय जनता पार्टी विधानसभा प्रमुख रमेश राजूरकर, भारतीय जनता युवा मोर्चा प्रदेश सचिव करण देवतळे , भारतीय जनता अल्पसंख्याक आघाडी प्रदेश उपाध्यक्ष तथा माजी नगराध्यक्ष न.प. वरोरा अहत्येश्याम अली, भारतीय जनता पार्टीचे जेष्ठ नेते बाबासाहेब भागडे, सिनेट सदस्य गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली तथा वैद्यकीय आघाडी जिल्हा संयोजक चंद्रपूर ग्रामीण डॉ. सागरजी वझे, भारतीय जनता पार्टी तालुका अध्यक्ष भगवान गायकवाड, वरोरा शहर अध्यक्ष सुरेश महाजन , तालुका महामंत्री ओम मांडवकर, दिलीप घोरपडे( माजी नगरसेवक) , अक्षय भिवदरे ( माजी नगरसेवक) सुनीता काकडे(माजी नगरसेविका) , कामगार सेना जिल्हा उपाध्यक्ष अनिकेत नाकडे, युवा मोर्चा शहर अध्यक्ष . संजय राम, कीर्ती कातोरे ( महिला जिल्हा सचिव),शुभांगी शुभांगी निंबाळकर (महिला तालुका अध्यक्ष) , सुजाता दुर्गोपुरोहित (जिल्हा सदस्य), वंदना दाते (माजी पं. स. सदस्य), कल्पना कथडे , संदीप गांधी, खुशाल बावणे , अभिजित गयनेवार, देविदास ताजने, शरद कातोरे, प्रमोद धवस, अजय वाटकर, पंकज जाधव , कादर शेख, सूरज येरणे, संतोष पवार, विनोद लोहकरे, प्रकाश दुर्गोपुरोहित, मधुकर टिपले, गजानन राऊत, जगदीश तोटावार , जगन ढाकणे, ओम यादव, प्रेम केशवानी, सुरेश कांबळे, प्रमोद जरिले, स्वप्नील देवाळकर, महेश उपाध्ये, अमोल देऊळकर, श्री. विजय मोकाशी, बाळू भोयर, सुरेश थुल, बाबा खंडाळकर, जयंत तांदुळकर , रवी शर्मा, मधुकर ठाकरे, गंगाधर कारेकार, अशोक अंडरस्कर, मोहन रंगदळ, ज्योती मुंजे, लीला बोढे आदी भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी, सदस्य बहुसंख्येने उपस्थित होते .या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाकरिता भारतीय जनता पार्टीचे सर्व पदाधिकारी, जेष्ठ नेते यांनी भारतीय जनता पार्टी प्रदेश सचिव करण देवतळे, जिल्हा कामगार सेना उपाध्यक्ष अनिकेत नाकाडे, युवा मोर्चा शहर अध्यक्ष संजय राम यांचे हार्दिकअभिनंदनकेले.




## गोविंदपूर ग्रामपंचायत कार्यालय येथे महसूल दिन साजरा



**नागभीड । प्रतिनिधी**

तालुक्यातील गोविंदपूर येथे महसूल पंधरवडा यांचा शुभारंभ व महसूल दिन ग्राम पंचायत कार्यालय येथे दि. १ ऑगस्ट गुरुवारी साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाला तळोधी (बा) अप्पर तहसीलदार योगेश शिंदे,सरपंच शालू हांडेकर, मंडळ अधिकारी नरेश बोधे,तलाठी अनिल चव्हाण, तलाठी सोनल कावळे, रक्षा अर्गेलवार, शरयू राठोड ,आपले सरकार केंद्र चालक पपील देशमुख,कोतवात रोशन सोनवाने,ग्रामपंचायत कर्मचारी व शेतकरी, अंगणवाडी सेविका, व गावकरी यांची उपस्थिती होती. यावेळी तहसीलदार योगेश शिंदे यांनी महसूल विभागाच्या विविध योजना बद्दल माहिती आणि मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मंडळ अधिकारी नरेश बोधे यांनी केले.यावेळी तहसीलदार योगेश शिंदे यांच्या हस्ते जात प्रमाणपत्र, उत्पन्न प्रमाणपत्र व सात बारा शेतकरी यांना वाटपकरण्यातआले.

## विवेक विचार मंच अमरावती तर्फे अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमित्त अभिवादन रॅली



**धामणगाव रेल्वे । प्रतिनिधी**

साहित्य सम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त विवेक विचार मंच च्या वतीने नगर परिषद प्रांगणात असलेल्या महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करुन शहापूर जुना धामणगाव येथील अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्या पर्यंत प्रशांत मुन यांच्या नेतृत्वात मोटार सायकल रॅली काढण्यात आली.

या रॅलीत सर्व महापुरुषांच्या जय घोष करण्यात आला.या रॅली मध्ये धिरज भैसारे .राजिक बेग.रवि उर्फ दादू मेश्राम .युवा नेते मनीष शेलारे.सदानंद कांबळे. प्रेम मोटघरे डॉ पवन झटाले स्नेहल वानखडे आदित्य शंभरकर सह कार्यकर्ते उपस्थित होते.

## शंकरपूर येथे महसूल पंधरवड्या चे उद्घाटन



**चिमूर । प्रतिनिधी**

महिला बालकल्याण विभाग व तहसील कार्यालय चिमूर यांच्या संयुक्त विद्यमाने शंकरपूर येथील अंगणवाडी केंद्रात महसूल पंधरवाडा चे उद्घाटन करण्यात आले.

या पंधरवड्या निमित्त पहिल्या दिवशी अंगणवाडी येथे माझी लाडकी बहीण योजनेची माहिती महिलांना देण्यात आली.

यासोबतच त्यांचे अर्ज भरून घेण्यात आले. तर ज्यांच्या अर्जात त्रुटी निर्माण झाल्या होत्या त्या त्रुटीची पूर्तता करण्यात आली. तर योजनेमध्ये ऑनलाईन अर्ज तथा ऑफलाइन अर्ज कसा करायचा या विषयावर मार्गदर्शन करण्यात आले. या कार्यक्रमाचे उद्घाटन शंकरपूरचे तलाठी प्रकाश पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून पत्रकार आमोद गौरकर, कोतवाल रतीराम लहाने उपस्थित होते. तर मार्गदर्शक म्हणून अंगणवाडी पर्यवेक्षिका नलिनी खानोरकर यांनी लाडकी बहिण योजने संदर्भात महिलांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे संचालन अंगणवाडी सेविका कलिंदा ढोक यांनी केले तर उपस्थितांचे आभार सुधा हिंगे यांनी मानले. या कार्यक्रमाला अंगणवाडी सेविका माया ढोक, लीला चंदेल, मीरा मेश्राम, मदतनीस शोभा सूर्यवंशी, दीक्षा ढोक, विश्रांती ढोक, सोनू ननावरे, सपना ढोक, लोभा डांगे, सुकेषणी धारणे व परिसरातील महिलांनीसहभागघेतला.

## अतिवृष्टीने वाहुन गेलेल्या पुलाची दुरुस्ती करा

### विहिरी आणि घरांच्या पडझडीची नुकसान भरपाई द्या;तहसीलदारांना निवेदन

**सेलू । प्रतिनिधी**

तालुक्यातील रेहकी येथे अतिवृष्टीने नाल्यावरील पूल वाहून गेला असून घरांची पडझड झाली. तसेच शेतातील विहिरी खचल्याने या झलेल्या नुकसानीची शासनाने मदत घ्यावी. अशी मागणी आज ता. १ ऑगस्ट गुरुवारी दुपारी १.३० वाजता रेहकीच्या माजी सरपंच रोशनी झाडे यांनी तहसीलदारांना निवेदन देऊन केली आहे.



१९ आणि २९ जुलैला झालेल्या पावसाने रेहकी येथे नदी नाल्यांना पूर येऊन जिल्हा परिषद शाळे लगत असलेल्या कालव्यावरील पूल वाहून गेला. त्यामुळे शाळेत जाणाऱ्या चिमुकल्यांचा रस्ता बंद झाला. त्यामुळे त्या पुलाची तात्काळ दुरुस्ती करावी. तसेच सततच्या पावसाने गावातील १० घरे पडली असून १२ शेतकऱ्यांच्या शेतातील विहिरी खचल्या आहेत. त्यांना नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी माजी सरपंच रोशनीताई झाडे यांच्यासह नागरिकांनी तहसीलदार डॉ स्वप्नील सोनवणे यांना निवेदन देऊन केली आहे. अतिवृष्टी मुळे वाहून गेलेल्या पुलाची दुरस्ती करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे पाठविल्याचे सांगण्यात येत आहे सध्या या ग्राम पंचायत वर प्रशासक राज आहे त्या मुळे या पुलाची डागडुजी त्वरित करण्याची गरज निर्माण झाली आहे.

## बावडा येथे अण्णाभाऊ साठे यांची जयंती उत्साहात साजरी

**इंदापूर । दत्तात्रय गवळी**

अण्णा भाऊ साठे यांच्या १०४ व्या जयंती निमित्ताने बावडा येथील साठेनगरात आयोजित केलेल्या जयंती कार्यक्रमात प्रमुख वक्ता म्हणून बोलताना पंडितराव पाटील म्हणाले,केवळ दीड दिवस शाळेत गेलेल्या अण्णांनी एकूण ३५ कादबऱ्या ,२२ कथासंग्रह,१४ लोकनाट्ये,८ पटकथा,१५ पोवाडे,१ प्रवासवर्णन असे विपुल लेखन करून साहित्य क्षेत्रात वैशिष्ट्यपूर्ण क्रांती केली.खास ग्रामीण बोली भाषेतून अण्णांनी वंचित,पीडित,व विषमतेने ग्रासलेल्या समाजाच्या व्यथा आपल्या साहित्यातून मांडण्याचा मौलीक काम केले.



यावेळी जयंती निमित्त शेतकरी संघर्ष समिती व किसान सार्वजनिक वाचनालय यांच्यावतीने अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यावर आधारित खुली प्रश्नमंजुषा स्पर्धेचे आयोजन केले यामध्ये १०० हून अधिक स्पर्धकांनी सहभाग घेतला या स्पर्धेत उत्तीर्ण स्पर्धकांना रोख बक्षिसे व प्रमाणपत्र दोन पुस्तके देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मान केला. यामध्ये अथर्व संजय कांबळे , प्रतीक राजेंद्र होनमाने, सुमित सुधीर गायकवाड, सुरज केशव साठे, ऋषिकेश किरण गायकवाड, स्वरा राकेश कांबळे, यांचा बक्षीस देऊन सन्मान केला.याप्रसंगी निरा भिमा सहकारी साखर कारखाना चे संचालक उदयसिंह पाटील, माजी सभापती प्रशांत पाटील यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमास सरपंच पल्लवी गिरमे उपसरपंच रणजीत घोगरे राष्ट्रवादी पक्षाचे युवक चे राज्य उपाध्यक्ष संग्राम सिंह पाटील तसेच अंकुश घाडगे विक्रम घोगरे विजय गायकवाड लक्ष्मण गायकवाड छगन गायकवाड ग्रामसेविका अंबिका पावशे व इतर मान्यवर उपस्थित होते या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन दत्तात्रय गायकवाडयांनीकेले.

# अतिवृष्टीमुळे मत्स्यबीज व मासे वाहून गेलेल्या मासेमारी तलावांना एक वर्षाची नि:शुल्क मुदतवाढ

### मत्स्यबोटुकलीसाठी करणार भरीव आर्थिक मदत;मच्छिमार कल्याणकारी मंडळ स्थापन करण्यासाठी घेणार पुढाकार

## भुजलाशयीन मच्छीमार बांधवांना मत्स्यव्यवसाय मंत्री सुधीर मुनगंटीवारांकडून मोठा दिलासा

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

जिल्ह्यात जिल्हा परिषद, जलसंपदा विभाग यांच्या अखत्यारीत असलेल्या तसेच माजी मालगुजारी तलावांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. यावर्षी जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे या तलावांमधून मत्स्यबीज व मासे वाहून गेल्यामुळे मासेमारी करणाऱ्या मच्छिमार बांधवांचे प्रचंड नुकसान झाल्याची जाणीव शासनाला असून, मासे वाहून गेलेल्या जिल्ह्यातील तलावांना कुठलेही शुल्क न आकारता एक वर्षाची मुदतवाढ द्या आणि त्यांना शासनाकडून बोटुकली (मत्स्यबीज) खरेदीसाठी आर्थिक मदत करा, असे निर्देश देत मच्छिमार बांधवांसाठी कल्याणकारी मंडळ स्थापन करण्यासाठी पुढाकार घेण्याचा निर्णय राज्याचे मत्स्यव्यवसाय मंत्री व जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी घेतला. बोटुकली खरेदीसाठी १४ कोटी रुपयांचे नियोजन करण्याच्या व अंमलबजावणीच्या सूचना मंत्री मुनगंटीवार यांनी दिल्या.

अलीकडेच पालकमंत्री मुनगंटीवार यांनी अतिवृष्टी झालेल्या विविध भागाची पाहणी केली. त्यावेळी शेतीच्या नुकसानासोबत मच्छीमारांच्या झालेल्या नुकसानाबाबत संबंधितांनी निदर्शनास आणून दिले होते. या बाबीची मत्स्यव्यवसाय मंत्री मुनगंटीवार यांनी तात्काळ दखल घेवून मत्स्यव्यवसाय विभागाच्या सर्व महत्त्वाच्या अधिकाऱ्यांची तातडीने चंद्रपूर येथे बैठक आयोजित केली होती. या बैठकीसाठी जिल्ह्यातील संबंधित सहकारी मच्छीमार संस्था, मच्छीमार बांधवही उपस्थित होते.



या बैठकीमध्ये नुकसानभरपाई सोबतच जिल्ह्यातील मच्छिमारीबाबतच्या इतर समस्यांबाबतही साधक बाधक चर्चा होऊन त्यावर तोडगा काढण्यासाठी मत्स्यव्यवसाय विभाग प्रयत्नशील असल्याचे सांगण्यात आले. या बैठकीसाठी प्रधान सचिव तथा मत्स्यव्यवसाय आयुक्त अतुल पाटणे, महाराष्ट्र मत्स्योद्योग विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक पंकज कुमार, सहआयुक्त देशपांडे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन, माजी आमदार अतुल देशकर यांच्यासह मत्स्य विभागाचे अधिकारी आणि मच्छिमार संस्थाचे पदाधिकारी उपस्थित होते.

मत्स्यव्यवसाय हा रोजगाराच्या दृष्टीने आणि जिल्ह्यातील मच्छिमार बांधवांच्या आर्थिक संपन्नतेसाठी अतिशय महत्वाचा विषय आहे. मत्स्यव्यावासायात चंद्रपूर जिल्हा मॉडेल ठरावा असा माझा प्रयत्न असून यासाठी मच्छिमार बांधवानी, संस्थानी हातात हात घालून संघटितपणे काम करावे असे आवाहन देखील पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी यावेळी केले. चंद्रपूर जिल्ह्यातील राज्याच्या आणि जिल्हा परिषदेच्या अखत्यारीत असलेल्या एक हजार पेक्षा अधिक तलाव ठेक्याना मुनगंटीवार यांच्या निर्णयाने विनाशुल्क मुदतवाढ मिळणार असून, जिल्ह्यातील तलावामध्ये टाकण्यासाठी आवश्यक ४६८ लक्ष (४ कोटी ) बोटुकलीची गरज भागविण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. यासाठी जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी, प्रधान सचिव (मत्स्य), महाराष्ट्र मत्स्योद्योग विकास महामंडळ यांनी सूक्ष्म नियोजन करावे, अशा सूचना दिल्या. जिल्ह्यातील प्रत्येक तलावाचे ऑडिट करण्याच्या सूचना देत मासेमारी करताना उत्पादन क्षमता वाढविणे, पायाभूत सुविधा मजबूत करणे याकडे आवर्जून लक्ष देण्याचे निर्देश मुनगंटीवार यांनी दिले. मच्छिमार बांधवांच्या अडचणी समजून घेण्यासाठी, सूचना मागविण्यासाठी आणि त्यावर तातडीने योग्य निर्णय घेण्यासाठी विभाग आणि संस्था यांच्यात समन्वय व्हावा याकरिता जिल्हा समिती स्थापन करण्याच्या सूचना यावेळी देण्यात आल्या.

### चंद्रपूरात मच्छिमार बांधवांसाठी प्रशिक्षण केंद्र

**मासेमारी करणाऱ्या मच्छिमार बांधवाना व मत्स्यबीज संगोपन यासाठी योग्य प्रशिक्षण मिळण्याची गरज आहे. ही बाब घेत मुनगंटीवार यांनी आयसीएआर व सीआयएफए या संस्थांशी बोलून, चर्चा करून असे प्रशिक्षण केंद्र चंद्रपूरला व्हावे या दृष्टीने कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या.**

### मूल येथे शीतगृह करणार

**मत्स्यविक्री करणारी केंद्रे, मार्केट सर्व सुविधायुक्त करताना तेथे स्वच्छता असावी याची काळजी घ्या, अद्ययावत फिश मार्केट करण्यासाठी पुढाकार घ्या असे आवाहन करतानाच मुनगंटीवार यांनी मूल येथे शीतगृह करण्यासाबंधी अधिकाऱ्यांनी सूचना दिल्या.**

### मच्छिमार कल्याणकारी मंडळ स्थापन करणार

**मासेमारी करून आपला उदरनिर्वाह करणाऱ्या मच्छीमार बांधवांचा सर्वांगीण विकास व्हावा, त्यांना शैक्षणिक व इतर क्षेत्रांमध्ये पुढे आणता यावे दृष्टीने राज्यात मच्छीमार कल्याणकारी मंडळ स्थापन करण्यासाठी नक्की पुढाकार घेणार असल्याचे आश्वासन पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी मच्छीमार बांधवांना दिले. यासाठी तातडीने मुख्यमंत्र्यांशी बोलून कार्यवाही करू असेही त्यांनी यावेळी सांगितले. यावेळी उपस्थित मच्छीमार बांधवांशी मुनगंटीवार तसेच मत्स्य व्यवसाय विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी संवाद साधून उपस्थित केलेल्या समस्यांबाबत मार्गदर्शन केले. तातडीने आयोजित केलेल्या बैठकीमुळे चंद्रपूर जिल्ह्यातील मच्छीमार बांधवांमध्ये एक उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले.**

# वरोरा तालुक्यातील हजारो शेतकरी पीक विम्यापासून वंचित

## अपात्र झालेले अर्ज पात्र करा-रमेश राजूरकर ; तहसीलदारांना निवेदन



**वरोरा । प्रतिनिधी**

शेतकऱ्यांना पिक विमा आज पर्यंत मिळाला नसल्याने व वरोरा तालुक्यातील जवळपास २० हजार शेतकऱ्यांचे पिक विमा अर्ज अपात्र झाले आहे. पिक विमा मिळावा व अपात्र झालेले अर्ज पात्र करण्याकरीता १ ऑगस्ट रोज गुरुवारला भारतीय जनता पक्षाचे वरोरा विधानसभा क्षेत्राचे निवडणूक प्रचार प्रमुख डॉ रमेश राजूरकर यांच्या नेतृत्वात तहसीलदारांना निवेदन देण्यात आले.यावेळी भाजप पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते .

वरोरा तालुक्यातील हजारो शेतकऱ्यांनी शासन व प्रशासनाच्या आव्हानावरून खरीप हंगाम २०२३ मध्ये कापूस सोयाबिन तूर ई. पिकांचा विमा प्रती हे. १ रु. प्रमाणे योजनेत ओरिएन्टल इन्शुरन्स क.लि. पुणे. ४११००५ यांच्या कडे ऑनलाईन काढला. वरोरा - भद्रावती तालुक्यात वर्धा नदी, कोंडा नाला, इरई नदी, शिरना नदी, दैवल नाला व छोट्या मोठ्या नाल्यांमध्ये जुलै, आगस्ट, सप्टेंबर मध्ये आलेल्या पूर, सततच पाऊस. अतिवृष्टी अवकाळी पाऊस यामुळे सोयाबिन वर आलेला मोझॉंक किड रोग ई. नैसर्गिक आपत्तीने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. पिक विमा नुकसान नियमानुसार ७२ तासात पुर्ण सुचना कंपनी कडे ऑनलाईन करण्यात आल्या. यांमध्ये जिल्हाधिकारी यांनी जाहीर केलेल्या नुकसानी प्रमाणे २५ टक्के अग्रीम सोयाबिनचे देण्यात आले पण आजपर्यंत ७५ टक्के रक्कम मिळाली नाही. तुर, कापुस पिकाचे २०२३-२४ हंगाम असूनही विमा भरपाई दिली नाही. पिक संरक्षणाकरीता विमा काढला, भरपाई करीता तालुक्याच्या ठिकाणी शेतकरी कृषी व विमा कार्यालयात हेलपाट्या मारुन थकले यांचा प्रचंड मानसिक त्रास शेतकऱ्यांना झाला.

### :: प्रमुख मागण्या ::

- ✻ सोयाबीन नुकसान भरपाईची उर्वरित ७५ टक्के रक्कम तात्काळ वाटप करावी.
- ✻ कापूस, तुर नुकसानी प्रमाणे १०० टक्के वाटप करावे.
- ✻ अतिवृष्टी पुरामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांची झालेली नुकसान भरपाई सर्व्हे शिट व ३ माहिती देण्यात यावी.
- ✻ अपात्र झालेल्या शेतकऱ्यांच्या अर्जाची चौकशी करुन पात्र करण्यात यावे.

सोयाबीनचे पावसामुळे नुकसान झाले एवढेच नव्हे तर सोयाबीन या पिकावर आलेल्या मोझेंक रोगामुळे हाती आलेले पिक पुर्णतहः उद्वस्त झाले. कपासीची नापीकी यापुर्वी कधीही नव्हती एवढी झाली.शेतकरी मार्च महीण्याकडे पिक विमा मिळेल या आशेने पूर्णतः सरकार व पिक विमा कंपणीकडे मोठ्या आशेने वाट पाहत होते. पिक विमा काढणारे शेतकऱ्यांनी ७२ तासाचे आत पुर्ण सुचना पिकविमा कंपनीला दिल्या. बरेचदा कंपनीच्या टोल फ्री नंबर उशीरा लागत होता . कंपनीची जबाबदार अधिकारी टाळाटाळीचे उत्तर देत होते.कंपनीने फक्त २५ टक्के रक्कम दिली व उर्वरित ७५ टक्के रक्कम ७ महीण्याचा कालावधी होऊन सुध्दा दिलेली नाही. पिकाच्या संरक्षणाकरीता विमा काढला परंतू शेतकऱ्यांना नुकसान भरपाई पासुन विमा कंपनीने वंचीत ठेवले आहे.तसेच पिक विमा करीता अर्ज करणाऱ्या शेतकऱ्यांपैकी वरोरा तालुक्यामधील जवळपास १५ ते २० हजार शेतकरी अपात्र झाले आहे. वेळोवेळी सर्वे करुन तथा हजारो शेतकत्यांचे अर्ज अपात्र कसे झाले असा प्रश्न सर्व शेतकऱ्यांच्या मनात पडला.पिक विम्याकरीता तालुक्याच्या ठिकाणी हेलपाटे मारुन शेतकरी आता त्रस्त झाले आहे. व त्यांचा मानसिक त्रास शेतकऱ्यांना होत आहे. एवढेच नव्हे तर नुकसानीचा अत्यंत्य कमी मोबदला देवून शेतकऱ्यांची थट्टा चालवीली आहे.लवकरात लवकर पिक विम्याची उर्वरीत ७५ टक्के रक्कम शेतकऱ्यांना देण्यात यावी व अपात्र झालेल्या शेतकऱ्यांच्या अर्जाची चौकशी करुन पात्र करण्यात यावे, तसेच आपल्या स्तरावरुन हे प्रकरण गंभीरतेने घेऊन तहसिलदार तथा अध्यक्ष तालुकास्तरीय तक्रार निवारण समिती वरोरा यांच्या अध्यक्षतेखाली तहसिलदार यांच्या दालनामध्ये तक्रार निवारण बैठकीचे अयोजन करण्यात यावे व तालुक्यातील शेतकऱ्यांना न्याय मिळून द्यावा. अशा आशयाचे निवेदन तहसीलदातर यांना देण्यात आले .यावेळी तालुका डॉ. भगवान गायकवाड, शहर अध्यक्ष सुरेश महाजन, प्रदेश सचिव युवा मोर्चा करण देवतळे, मा. नगराध्यक्ष अहेतेश्याम अली, मा. जिल्हा प. स. श्री राजुभाऊ गायकवाड, ओ.बी.सी आघाडी जिल्हा अध्यक्ष डॉ. अंकुश आगलावे, जिल्हा संयोजक वैद्यकिय आघाडी डॉ. सागर वझे, राजू दोडके, विशाल पारखी, उमेश माहुरे, गजानन राऊत, दिपक चव्हाण, देविदास ताजणे, विनोद लोहकरे, मधुसुदन टिपले, सारंग किन्हेकर, विजय पावडे, राजु दाते, प्रकाश दुर्गपुरोहित, निंबाळकर, शरद कातोरे, प्रमोद ढाकणे, शहर अध्यक्ष संजय राम, जिल्हा उपाध्यक्ष कामगार आघाडी अनिकेत नाकाडे तालुका महामंत्री भाजयुमो. सुरज धात्रक तसेच भारतीय जनता पक्षाचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते व संख्येने शेतकरी उपस्थित होते.



**“ येत्या ७ दिवसांमध्ये आमच्या मागण्या पूर्ण न झाल्यास संपूर्ण तालुक्या मध्ये पिक विमा कंपनी विरोधात आक्रमक आंदोलन करण्यात येईल याची जबाबदारी प्रशासनाची राहील असा इशारा भारतीय जनता पक्षाचे वरोरा विधानसभा क्षेत्राचे निवडणूक प्रचार प्रमुख डॉ रमेश राजूरकर यांनी दिला.**

# चंद्रपूर शहरातील पाणीपुरवठा त्वरित नियमित करा-काँग्रेस नेते महेश मेंढे

## चंद्रपूर शहर महानगरपालिका आयुक्त यांना निवेदन






**चंद्रपूर । प्रतिनिधी**

शहरात पाणीपुरवठा योजनेच्या माध्यमातून एक दिवस आड पाणीपुरवठा केला जातो मात्र गेल्या काही दिवसांपासून एक दिवसा आड होणारा पाणीपुरवठा अनियमित असून त्यामुळे नागरिकांना प्रचंड मानसिक त्रास सहन करावा लागतो आहे. ऐन पावसाळ्यात हा त्रास होत असल्याने नागरिक त्रस्त झाली आहे शिवाय जो पाणीपुरवठा होतो तोही दूषित होत असून यामुळे नागरिकांच्या आरोग्य धोका येण्याची भीती निर्माण झाली आहे पाणीपुरवठा विभाग एक दिवस आड पाणी पुरवठा करतो मात्र बिल नियमितपणे वसूल करतो, हा प्रकार अन्यायकारक आहे. त्यामुळे पाणीपुरवठा नियमितपणे व तोही स्वच्छ आणि मुबलक प्रमाणात करण्यात यावा या विषयाअंतर्गत चंद्रपूर शहर महानगरपालिका आयुक्त यांना निवेदनाच्या माध्यमातून विनंती करण्यात आली.

चंद्रपूर शहर महानगरपालिका आयुक्त यांनी सकारात्मक भूमिका घेत लवकरात लवकर पाण्यासंबंधी समस्येचे निवारण करण्यात येईल असे आश्वासन दिले निवेदन देते वेळेस शिष्टमंडळामध्ये माजी नगरसेवक वसंता भाऊ देशमुख, लता ताई बंडू जांगडे,प्रकाश चंदनखेडे ,हाजी सय्यद हारून, मोनू रामटेके, सरपंच रोशन रामटेके, अविनाश मेश्राम मोहम्मद इरफान शेख आदी सह चंद्रपूर शहरातील शेकडो नागरिकांच्या समावेश होता.

# आंतर महाविद्यालयीन 'टेबल टेनिस' स्पर्धेमध्ये कृषी महाविद्यालयाच्या मुलींची चमू विजेती



**वरोरा । प्रतिनिधी**

डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला अंतर्गत आंतर महाविद्यालयीन टेबल टेनिस स्पर्धा येथे पी.आर. पोटे पाटील कृषी महाविद्यालय, अमरावती येथे संपन्न झाल्या.

या स्पर्धेमध्ये आनंद निकेतन कृषी महाविद्यालयाच्या मुलींच्या संघानी विजेतेपद प्राप्त केले आहे. विजेता ठरलेल्या मुलींच्या संघामध्ये सातव्या सत्रातील मधुरा गजेंद्र नरवाडे , पाचव्या सत्रातील भक्ती विवेक पातोंड, रेवा सुंदर मनगर आणि आदिती महेशकुमार वैद्य यांचा समावेश होता.

चमू व्यवस्थापक डॉ.आर एम पारधी यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थिनींनी हे सुयश संपादन केले. यशस्वी विद्यार्थिनींचे महारोगी सेवा समितीचे सचिव, डॉ. विकास आमटे, विश्वस्त कौस्तुभ आमटे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस एस पोतदार, विद्यार्थी कल्याण अधिकारी प्रा. आर. एच. रहाटे, शिक्षण विभाग प्रमुख प्रा. ज्योति श्रीराव तसेच इतर शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# दूध उत्पादकता क्षमता बांधणी कार्यक्रम



**वरोरा । प्रतिनिधी**

एम ३ एम फांउडेशन व कृषी विकास व ग्रामीण प्रशिक्षण संस्था मलकापूर , यांच्या संयुक्त विद्यमाने आदिवासी उपजीविका विकास कार्यकम प्रकल्प अंतर्गत दुध उत्पादकांची क्षमता बांधणी कार्यक्रम शेगाव (बु.)येथे पार पडला .

कार्यक्रमात पशुधन विकास अधिकारी डॉ.सतीश अघडते ,कृषी विकास प्रकल्प समन्वयक कुंदन राणे,टीम लीडर रोशन माणकर, वाडी प्रकल्प व्यवस्थापक संतोष गुजर,वाडी प्रकल्प व्यवस्थापक सचिन पाटील,वनधन शेतकरी कंपनीचे अध्यक्ष सुधीर नन्नावरे,दशरथ देहारकर,प्रकल्प कृषी अधिकारी प्रबुद्ध डोये इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमात शेगाव (बु.) परिसरातील असलेले खेमजई,भटाळा,आसाळा,शेगाव, (बु.)शेगाव खु.,दादापूर,अर्जुनी,वायगाव (ख)चारगाव बु,चारगाव खु,मेसा,बिजोनी,कोकेवाडा येथील दुध उत्पादक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. डॉ.अघडते पशुधन विकास अधिकारी यांनी दुध शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले.त्यामध्ये दुधाळ गाईची योग्य प्रजाती ची निवड करणे त्यांच्या जनावरांचे व्यवस्थापन,आजार व त्यावरील उपचार ,जनावरांचे आहारामध्ये खाद्यासाठी कमी खर्चात नेपियरची लागवड करणे , मिनरल,कॅल्शियम वापरणे त्यामुळे दुधाचे प्रमाण वाढून त्यांचे उत्पन्न देखील वाढेल सोबत शेगाव येथील अनेक वर्षापासून मदर डेअरी दुध केंद्र चालवत असलेले गजानन ठाकरे यांनी सुद्धा जनावरांना बद्दल काळजी व नियोजन योग्य प्रकारे करून योग्य जनावर निवडून व्यवसायात वाढ व्हावी असे सांगितले कार्यक्रमाचे संचालन प्रकल्प अधिकारी अनिल पेंदाम यांनी केले तर आभार प्रदर्शन रमेश चौधरी यांनी केले सोबत कार्यक्रमात तालुका समन्वयक दीक्षांत राऊत ,निकलेश चौधरी , प्रफुल जुमडे, विशाल मन्ने व मनोज वरभे यांनी कार्यक्रमात सहकार्य केले

# मूल शहरातील पथविक्रेता समितीची बिन विरोध निवड,नियुक्ती प्रमाणपत्र प्रदान



**मूल । प्रतिनिधी**

पथविक्रेता समिती अधिनियम २०१४ तरतुदीनुसार मूल शहरात पथविक्रेता समितीसाठी निवडणूक कार्यक्रम घोषित करण्यात आला होता. यामध्ये शासकीय विभाग, इतर मंडळे आणि पथविक्रेत्यांचे आठ सदस्य असतात. एकुण २० सदस्यांपैकी ८ सदस्य पथविक्रेत्यांमधून निर्वाचित करून द्यायचे असतात. त्या अनुषंगाने ३१ जुलै रोजी निवडून जाहीर केली होती. मात्र आठ च नामनिर्देशन फॉर्म आल्याने ही निवडणूक बिनविरोध झाली.

सर्वसाधारण खुला गटातून अमित रामदास राऊत, धर्मेंद्र बालाजी सूत्रपवार, नलिनी दिनेश आडपवार, अनुसूचित जाती मध्ये अरुण दादाजी खोब्रागडे, अनुसूचित जमाती मध्ये धनराज गणपत कुमरे, इतर मागास प्रवर्ग महिला मध्ये वैशाली प्रमोद मशाखेत्री, अल्पसंख्यांक महिला राखीव नुरजहा मजहर बेग, दिव्यांगा मधून अरविंद देविदास बुटले यांची नगर पथविक्रेता समितीच्या सदस्य पदी बिनविरोध निवड झाली.निवडून आलेल्या आठ सदस्यांना प्रशासक तथा उपविभागीय अधिकारी विशाल कुमार मेश्राम आणि निवडणूक निर्णय अधिकारी तथा मुख्याधिकारी यशवंत पवार यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन पथविक्रेता समितीमध्ये नियुक्त झाल्याचे प्रमाणपत्र देण्यात आले. यावेळी सर्व बिनविरोध निवडून आलेल्या पथविक्रेता सदस्यांचे श्रमिक एल्गारच्या ड.पारोमिता गोस्वामी, विजय सिद्धावार आदींनी अभिनंदनकेलेआहे.



**“ पथविक्रेता समिती अधिनियम २०१४ तरतुदीनुसार आपण शहरात पथविक्रेता समितीसाठी निवडणूक कार्यक्रम घोषित केला होता. यामध्ये एकुण २० सदस्यांपैकी ८ सदस्य पथविक्रेत्यांमधून निर्वाचित करून द्यायचे असतात. त्या अनुषंगाने ३१ जुलै रोजी निवडून जाहीर केली होती. परंतु आठ अर्ज आल्याने ही निवडणूक बिनविरोध झाली. निवडून आलेल्या आठ सदस्यांना प्रमाणपत्र देऊन पथविक्रेता समितीमध्ये नियुक्त झाल्याचे कळविण्यात आले.**

**यशवंत पवार,**
**निवडणूक निर्णय अधिकारी**
**तथा मुख्याधिकारी,मूल**

# ब्ल्यू डायमंड आंतरप्रुनर्स क्लब, नागपुर तर्फे एक दिवशीय कार्यशाळेचे आयोजन

**नागपूर । प्रतिनिधी**

ब्ल्यू डायमंड आंतरप्रुनर्स क्लब, नागपुर तर्फे युवक, युवती, स्टार्ट अप बिझनेस , ग्रुह् उद्योग करणारे व लहान व्यापाऱ्याकरिता एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन आयोज ३ आगष्ट ला स्थानिक रवि भवन, नागपुर येथे आयोजन करण्यात आले आहे . ब्ल्यू डायमंड आंतरप्रुनर्स क्लव नागपुर तर्फे युवक युवती,स्टार्ट अप बिझनेस, गृह उद्योग करणारे व लहान व्यापाऱ्यांकरीता फेसबुक व इंस्टाग्राम या समाजमाध्यमाद्वारे आपल्या व्यापाराचे मार्केटींग कसे करावे या विषयावर रवि भवन, नागपुर येथे दि शनिवार दि. ३ आगष्ट ला सकाळी १०:३० ते १२:३० या वेळेत कार्यशाळेचे आयोजन करण्यात आलेले आहे. या कार्यशाळेचा युवक युवती, गृह उद्योग करणारे, लहान व्यापारी ,स्टार्ट अप बिझनेस करणारे युवक युवती यांनी लाभ घ्यावा असे आवाहन ब्ल्यू डायमंड आंतरप्रुनर्स क्लब तर्फे करण्यात आलेले आहे. अधिक माहिती करिता ९३७३७२६४४४, ९५११२४२९८० या मोबाईल नंबर वर संपर्क साधावा असे आवाहन ब्ल्यू डायमंड आंतरप्रुनर्स क्लव नागपुर तर्फे करण्यात आले आहे .

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .